# ***बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम***
# ***(बृहन्मुंबई महानगरपालिका)***

## मागास प्रवर्गाकरिता राखीव असलेल्या पदांचा अनुशेष भरुन काढण्याकरिता विशेष भरती मोहीम

बेस्ट उपक्रमाच्या परिवहन अभियांत्रिकी विभागात रिक्त असलेली मागास प्रवर्गाकरिताची खाली नमूद केलेली पदे भरण्याकरिता प्रत्येक पदाखाली दिलेली आवश्यकता पूर्ण करणा-या तत्सम राखीव प्रवर्गाच्या पात्र पुरुष उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

(१) **दुय्यम अभियंता श्रेणी जी/जी-५**:-

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST) - १ (एक) |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | ऑल इंडिया काऊन्सील ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या मान्यताप्राप्त संस्थेची मेकॅनिकल/ऑटोमोबाईल/ प्रोडक्शन इंजिनिअरिंग मधील पदविका/पदविकोत्तर अर्हता असणे आवश्यक |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास मोठया कार्यशाळेत / राज्य परिवहन मंडळातील तांत्रिकी विभागात बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ.ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान १५ वर्षाचा अनुभव असावा. त्यापैकी ५ वर्षे स्वत: काम केल्याचा व १० वर्षे पर्यवेक्षक म्हणून काम केल्याचा अनुभव असावा.तसेच विविध प्रकारच्या विद्युत युनिटस्च्या कार्याबद्दल पूर्णत: माहिती असणे आवश्यक .तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल. |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी ३५-४५ वर्षे वयोगटात असणे आवश्यक. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | जी/जी५(रुपये ५६६५-९११५) श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१८८००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र.,** | | |

(२) **महाकार्यदेशक(यांत्रिकी) श्रेणी टी-८**

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)-२ (दोन) |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि ऑटोमोबाईल व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास परिवहन कंपनीतील /उपक्रमातील तांत्रिक विभागात बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ.ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी या कामावर पर्यवेक्षक म्हणून १२ ते १५ वर्षे प्रत्यक्ष कामाचा अनुभव . तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल. |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असणे आवश्यक |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा(दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी ४५ वर्षापेक्षा अधिक नसावे. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-८(रुपये ५५७५-८६५५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१८५००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## (३) कार्यदेशक(यांत्रिकी) श्रेणी टी-७

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)- २ (दोन) |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि यांत्रिकी मोटार वाहन व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास मोठया कार्यशाळेत बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ.ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान ६ ते ८ वर्षांचा अनुभव असावा. त्यापैकी २ वर्षे पर्यवेक्षक म्हणून अनुभव असावा .परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य. तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य, नसल्यास नियुक्तीपूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे. |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २५-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक .योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम . |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-७(रुपये ५३१०-७२४०)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५८००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## ४) कार्यदेशक(सांगाडा) श्रेणी टी-७

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)-१ (एक) |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण . जोडारी/मोटार वाहन सांगाडा उभारणी/धातूपत्रा कारागीर या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण. |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास मोठया कार्यशाळेत बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ.ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान ६ ते ८ वर्षांचा अनुभव असावा .त्यापैकी २ वर्षे पर्यवेक्षक म्हणून अनुभव असावा .परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य. तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य . नसल्यास परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे. |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २५-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक.योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-७(रुपये ५३१०-७२४०) श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५८००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## (५) सहाय्यक कार्यदेशक(यांत्रिकी) श्रेणी टी-६

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)- १२<br>विमुक्त जाती(अ)(VJ-A)- ४<br>भटक्या जमाती(ब)(NT-B)- ४<br>भटक्या जमाती(क)(NT-C)- ४<br>विशेष मागास प्रवर्ग - १<br>------<br>एकूण २५<br>------ |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि यांत्रिकी मोटार वाहन व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास यांत्रिकी मोटार वाहन म्हणून मोठया कार्यशाळेत, बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ .ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान ३ ते ५ वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा . परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य. तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य, नसल्यास नियुक्तीपूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे. |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २२-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक.योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-६(रुपये ५०६०-६८९५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५०००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## (६) सहाय्यक कार्यदेशक(विद्युत) श्रेणी टी–६

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)- २<br>विमुक्त जाती(अ)(VJ-A)- १<br>भटक्या जमाती(ब)(NT-B-)- १<br>भटक्या जमाती(क)(NT-C)- १<br>विशेष मागास प्रवर्ग)(SBC)- १<br>एकूण ६ |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि इलेक्ट्रिशयन/ऑटो . इलेक्ट्रिशियन व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण. |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास ऑटो इलेक्ट्रिशियन म्हणून मोठया कार्यशाळेत, बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ .ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान ३ ते ५ वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा .परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य. तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे **(PWD)** द्वीतीय वर्गाचे तारतंत्रींचे प्रमाणपत्र असणे आवश्यक. तसेच उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य, नसल्यास परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे. |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २२–३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक. योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी–६(रुपये ५०६०–६८९५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५०००/– |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## (७) <u>सहाय्यक कार्यदेशक(व्हल्कनायझिंग) श्रेणी टी-६</u>

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | विमुक्त जाती(VJ-A)- १<br>------<br>एकूण १<br>------ |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | उमेदवार किमान इयत्ता सातवीची परीक्षा उत्तीर्ण असावा आणि इंग्रजी आकडे वाचू शकला पाहिजे. रबर टेक्नॉलॉजीमधील व्यवसाय प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल |
| iii) | अनुभव | : | टायर दुरुस्ती कामगार म्हणून परिवहन उपक्रम/टायर कंपनी किंवा टायर रिसोलर / दुरुस्ती गॅरेजमधील टायर दुरुस्ती आणि परिरक्षा कामाचा ३ ते ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असावा. तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य,नसल्यास परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | आवश्यक |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २२-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक.योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-६(रुपये ५०६०-६८९५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५०००/-. |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## (८) सहाय्यक कार्यदेशक(सांगाडा) श्रेणी टी-६

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)- १<br>------<br>एकूण १<br>------ |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि जोडारी/मोटार वाहन सांगाडा उभारणी/धातूपत्रा कारागीर या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास जोडारी/पत्रावाला(धातुपत्रा कारागीर) म्हणून मोठया कार्यशाळेत बस/ट्रक्स्चे चौथरे,सांगाडा इ.ची डागडूजी,परिरक्षा व हाताळणी करण्याचा किमान ३ ते ५ वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा .परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य . तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल. |
| iv) | इतर आवश्यकता | : | उमेदवाराकडे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने दिलेला जड वाहने चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य,नसल्यास परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी उमेदवाराने सदर परवाना मिळविणे आवश्यक आहे. |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २२-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक.योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा क्षिथिलक्षम. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-६(रुपये ५०६०-६८९५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वित्तलब्धी दरमहा रु.१५०००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

(९) **सहाय्यक कार्यदेशक(सांधाता श्रेणी टी-६**

| | | | |
|---|---|---|---|
| i) | रिक्त पदांची संख्या | : | अनुसूचित जमाती(ST)- १<br>------<br>एकूण १<br>------ |
| ii) | शैक्षणिक अर्हता | : | शालान्त परीक्षा उत्तीर्ण आणि सांधाता या व्यवसायातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची परीक्षा आणि राष्ट्रीय वृत्तिक व्यवसाय प्रशिक्षण परिषदेची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| iii) | अनुभव | : | उमेदवारास सांधाता म्हणून मोठया कार्यशाळेत गॅस वेल्डिंग,इलेक्ट्रिकल वेल्डिंग,स्प्रे पावडर, स्प्रे मेटल,कॉपर,ब्रास,ॲल्युमिनियम ब्रेझिंग इत्यादींची हाताळणी करण्याचा किमान ३ ते ५ वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असावा . परिवहन सेवेतील अनुभवास प्राधान्य . तथापि, योग्य उमेदवारांच्या बाबतीत अनुभव शिथिल करण्यात येईल. |
| iv) | इतर आवश्यकता | : | काही नाही |
| v) | मराठी भाषेचे ज्ञान | : | उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतर परीक्षा (दहावी/बारावी) किमान १०० किंवा ५० गुणांचा मराठी विषय(निम्नतर किंवा उच्चतर) घेवून उत्तीर्ण झालेला असावा. |
| vi) | वय | : | दिनांक ३१.१.२०१२ रोजी २२-३८ वर्षे वयोगटात असणे आवश्यक.योग्य उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ृक्षिथिलक्षम. |
| vii) | वेतन श्रेणी आणि एकूण वित्तलब्धी | : | टी-६(रुपये ५०६०-६८९५)<br>श्रेणीच्या किमान स्तरावर एकूण वितलब्धी दरमहा रु.१५०००/- |
| viii) | **पाळीमध्ये काम करावयाचे असल्याने फक्त पुरुष उमेदवार पात्र** | | |

## सर्व पदांकरिता लागू असलेल्या सर्वसामान्य अटी व शर्ती आणि अन्य आवश्यकतांची परिपूर्ती

१. प्रत्येक पदाकरीता दाखविलेल्या एकूण अंदाजित वित्तलब्धीसह इतर लाभांमध्ये भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, रजा प्रवास सहाय्य,वातानुकूलित बसेस व्यतिरिक्त इतर बसेसमधून मोफत बस प्रवास (बसपास / बसटोकन), प्रचलित नियमांनुसार रजेचे रोखीकरण आणि उपक्रमाच्या मोफत वैद्यकिय सुविधा इ.चा समावेश राहील.

२. शैक्षणिक अर्हता,अनुभव आणि इतर आवश्यकता यांची पूर्तता करत असलेल्या उमेदवारांनी बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज करावा.

३. अर्जावर सध्याचे रंगीत छायाचित्र चिटकवुन व अर्जासोबत वय,शैक्षणिक /तांत्रिक अर्हता,अनुभव,जातीचा दाखला,जातवैधता प्रमाणपत्र(असल्यास) इ.च्या साक्षांकित केलेल्या छायामुद्रीत प्रती जोडाव्यात व बेस्ट उपक्रम (BEST Undertaking) यांच्या नावे काढलेला व मुंबईत देय असलेल्या रु.३५/- (रुपये पस्तीस) रुपयांचा रेखांकित बॅंक डिमांड ड्राफ्ट किंवा पे ऑर्डर जोडावी.

४. दिनांक २६.३.२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार उमेदवाराची निवड झाल्यानंतर जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास, जातवैधता प्रमाणपत्राबाबतची आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करून विहित कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच उपक्रमाच्या सेवेत नियुक्ती देण्यात येईल .तसेच विजा(अ)/भज(ब)/भज(क)/भज(ड)/विमाप्र उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याचे नवीनतम प्रमाणपत्र भरतीच्यावेळेस / नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास अर्ज अपात्र .

५. अर्ज मराठीमध्येच भरावा परंतु तो वाचता येण्याजोगा असावा अन्यथा अर्ज बाद ठरविण्यात येईल

६. सादर केलेला कोणताही पुरावा खोटा/बनावट आढळून आल्यास अर्ज बाद करण्यात येईल.तसेच निवड प्रक्रियेदरम्यान वा नियुक्तीनंतर सदर बाब आढळून आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवारांची नियुक्ती रद्दबातल/समाप्त करण्यात येईल.

७. पोष्टाने पाठविलेल्या अर्जाच्या लिफाफ्यावर ठळक अक्षरात " .................. " या पदासाठी अर्ज' असा स्पष्ट उल्लेख करावा.

८. सर्व पदांवरील उमेदवारांना पाळीमध्ये म्हणजे सकाळ,दुपार,रात्र या नुसार आळीपाळीने तीनही सत्रात काम करावे लागणार असल्यामुळे फक्त पुरुष उमेदवार पात्र.

९. रिक्त पदांच्या संख्येत प्रशासकीय कारणांमुळे बदल होऊ शकतो.याबाबत कोणताही खुलासा करणे प्रशासनावर बंधनकारक असणार नाही.

१०. उमेदवारांनी आपले अर्ज **आस्थापना अधिकारी परिवहन,परिवहन अभियांत्रिकी विभाग,बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, दादर कार्यशाळा, तळ मजला, द्वार क्रमांक ४, लोकमान्य टिळक रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४** येथे दिनांक ३१.१.२०१२ पूर्वी पोच होतील या बेताने पाठवावेत . त्यानंतर आलेले अर्ज रद्बातल ठरविण्यात येतील. अर्जांची पोच पावती देण्यात येणार नाही.

११. जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही निवड प्रक्रियेसाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्यास किंवा लेखी अथवा प्रात्यक्षिक परीक्षेत तोतया व्यक्तिंची व्यवस्था केल्याचे आढळून आल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

१२. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर बेस्ट उपक्रमास लागू असलेले नियम/स्थायी आदेश/सेवाशर्ती लागू असतील.

१३. जाती प्रमाणपत्रासाठी/जाती वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची पावती ग्राहय धरण्यात येणार नाही.

१४. **निवड प्रक्रिया:**

(अ) **कागदपत्राची/प्रमाणपत्राची पडताळणी:-**

कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीसाठी तारीख आणि वेळ कळविण्यात येईल दिलेल्या तारीख/वेळेला उमेदवारांनी उपस्थित राहून त्यांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव,वय, जात आदीच्या पडताळणीकरिता मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे प्रस्तुत

करणे आवश्यक आहे .पडताळणीमध्ये पात्र आढळून आलेल्या उमेदवारांना (दुय्यम अभियंता पदाच्या उमेदवारांव्यतिरिक्त) लेखी परीक्षेसाठी / मुलाखती/प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल . दुय्यम अभियंता पदासाठीच्या पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल . कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणी/लेखी परीक्षा/मुलाखत ही मुंबईत होईल.

(ब) **लेखी परीक्षा /मुलाखत**

**(i)** ***अनुक्रमांक १ (दुय्यम अभियंता ) पदाकरिता***

मुलाखत ५० गुणांची असेल .त्यापैकी ४५% म्हणजेच २२ १/२ गुण (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शिथिल केलेली अट ) मिळविणा–या उमेदवारांना उत्तीर्ण घोषित करण्यात येईल.

**(ii)** ***अनुक्रमांक २ ते ९ पदांकरिता***

लेखी परीक्षा ५० गुणांची असेल व ४५% म्हणजे २२ १/२ गुण (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शिथिल केलेली अट) मिळविणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत ५० गुणांची असेल व ४५% म्हणजेच २२ १/२ गुण (मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत शिथिल केलेली अट) मिळविणा-या उमेदवारांना उत्तीर्ण घोषित करण्यात येईल

(क) निवड झालेल्या उमेदवारांची निवड प्रक्रियेत मिळालेल्या एकण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी बनविण्यात येईल. ज्या उमेदवारांना समान गुण मिळतील त्यांना जन्मतारखेनुसार (जास्त वयाच्या उमेदवारांना प्राधान्य) व जन्मतारीख समान असणा-या उमेदवारांसंबंधात उमेदवारांच्या पहिल्या नावाच्या इंग्रजी मुळाक्षरानुसार निवड यादीतील क्रमांक ठरविण्यात येईल.अंतिम गुणवत्ता यादीतील ज्या उमेदवारांकडे जातवैधता प्रमाणपत्र असेल अशा उमेदवारांना गुणवत्ता यादीतील त्यांचा गुणानुक्रम विचारात न घेता नियुक्तीसाठी प्राधान्य देवून , जाती प्रवर्गातील पदांच्या उपलब्धतेनुसार नेमणूकीकरिता बोलविण्यात येईल.नियुक्तीपूर्वी उमेदवारांस उपक्रमातर्फे घेण्यात येणा-या वैद्यकिय चाचणीत उतीर्ण होणे आवश्यक आहे.उमेदवारांची प्रतिक्षायादी दोन वर्षांपर्यन्त विधी ग्राहय असेल.त्यानंतर सादर प्रतिक्षायादी बाद होईल.

(ड) वरील निवड कार्यपध्दतीत बदल करावयाची आवश्यकता भासल्यास ,आवश्यक ते बदल प्रशासनाकडून करण्यात येतील.आवश्यक असल्यास निवड/भरती प्रक्रिया प्रशासनाकडून कधीही स्थगित किंवा पुढे ढकलली जावू शकते / रद्द होऊ शकते.

(ई) उमेदवार निवडीबाबत प्रशासनाचा निर्णय अंतिम असेल.यासंबंधी केलेल्या कोणत्याही तोंडी अथवा लेखी चौकशीस /पत्र व्यवहारास खुलासा/उत्तर देणे उपक्रमावर बंधनकारक असणार नाही.

(त) उमेदवारास कोणत्याही न्यायालयात नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा झालेली असल्यास तो नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

(थ) लेखी परीक्षा/प्रमाणपत्रांची छाननी इत्यादींकरिता बोलविलेल्या उमेदवारांना प्रवास खर्च देण्यात येणार नाही.मात्र जे उमेदवार लेखी परीक्षेत उत्तीर्ण होतील व ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल त्यांना मुलाखतीस उपस्थित राहिल्यास शासनाच्या निर्देशानुसार एका वेळेचा येण्या - जाण्याचा खर्च प्रदान करण्यात येईल.

(द) वरील जाहिरातीनुसार प्राप्त झालेले अर्ज बाद ठरविण्याचा/करण्याचा व अटी, शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार महाव्यवस्थापकांकडे राहतील.

---